नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १८/०३/२०२५ (मंगळवार) दुपार

---

# एशियन फायर वर्क कंपनी स्फोट मधील कंपनी मालक सोहेल अली अजगर अली अमीन याला करण्यात आली अटक

एशीयन फायर वर्क कंपनी मध्ये गण पावडर पासुन वाती बनविण्याचे काम सुरू होते. दिनांक १६/०२/२०२४ रोजी निष्काळजीपणा मुळे कंपनी मध्ये स्फोट झाला कंपनी मध्ये काम करणारे कामगार १) मुनप कुमार मरावी, वय ३७ वर्ष, रा. मंडला मध्य प्रदेश २) भुरा रज्जाक ,वय २५ वर्षे, रा. भिल माता. लखना दौड या कामगार यांचा मृत्यु झाला तसेच ०१ ईसम किरकोळ जखमी व ०२ इसम गंभीर जखमी झाले होते. कंपनी मध्ये झालेल्या स्फोटकाच्या बाबतीत हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे स्फोट झालेला असुन त्यावरून कळमेश्वर पोलीसांनी आरोपी मुस्तफा सैफ उददीन शेगाववाला वय ५६ वर्ष रा. सलमा मंजील सुभाष चौक हनुमान बस्ती अकोला. ह.मु.कोतवाल बर्डी ता. काटोल जि. नागपूर. आणि एशीयन फायर वर्क कंपनीचे मालक सोहेल अली अजगर अली अमीन, रा. प्लॉट नं ९ चिटणीसपुरा ले आउट बैरामजी टाउन सदर नागपूर यांचे विरूध्द कलम १०६ (१),२८८, १२५(बी), १०५, ११० भा.न्या.सं २०२३ सहकलम कलम ९(ब) एक्सप्लोझिव्ह ॲक्ट १८८४ सहकलम ३ एक्सप्लोझिव्ह सबस्टान्सेस ॲक्ट १९०८ या कलमान्वये गुन्हा नोंद केला होता. सदर गुन्हयाचा तपास श्री. अनिल म्हस्के, उपविभागिय पोलीस अधिकारी तथा सहा.पोलीस अधिक्षक सावनेर विभाग हे करत आहे.

तपासा दरम्यान पोलीसांनी सदर गुन्हयात आरोपी मुस्तफा सैफउददीन शेगाववाला, वय ५६ वर्ष ,रा. सलमा मंजील सुभाष चौक हनुमान बस्ती अकोला. ह.मु.कोतवालबर्डी ता. काटोल जि. नागपूर याला दिनांक १८/०२/२०२५ रोजी अटक करण्यात आली होती परंतु एशीयन फायरवर्क कंपनी मालक सोहेल अली अजगर अली अमीन रा. प्लॉट नं ९ चिटणीसपुरा ले आउट बैरामजी टाउन सदर नागपूर हे घटना झाल्याचे दिवसापासुन फारार होते.

दिनांक २१/०२/२०२५ रोजी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कळमेश्वर याचें कोर्टातुन कलम ७५ भारतीय नागरिक सुरक्षा संहीता प्रमाणे नमुद आरोपीचा पकड वारंट काढण्यात आले. सदर आरोपी यांनी दिनांक २२/०२/२०२५ रोजी अटकपुर्व जामीन मिळविण्या करीता

मा. न्यायालयात अटकपुर्व जामीनची मागणी केली होती परंतु पोलीसांनी अथक परीश्रम करून वारंवार मा.न्यायालयात अहवाल दाखल केल्याने मा.न्यायालयाने सदर आरोपीचे अटकपुर्व जामीन नामंजुर केले. सदर आरेपी हा परदेशात पळुन जाण्याची तयारीत असल्याने मा.श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण याचे मार्गदर्शनाखाली गृहमंत्रालय, भारतसरकार येथे L.O.C (लुक आउट सर्कुलर) चे अहवाल पाठविण्यात आले होते. दिनांक ०५/०३/२०२५ रोजी गृहमंत्रालय,भारत सरकार यांनी सदर आरोपी विरूध्द L.O.C (लुक आउट सर्कुलर)जारी केले होते.त्याच प्रमाणे तांत्रिक पद्ध्दीतीचा वापर करून एशीयन फायर वर्क कंपनी मालक सोहेल अली अजगर अली अमीन याला राज्य छत्तीगड जि.रायपुर चे पोलीस स्टेशन कोतवाली हद्दीचे परीसरातुन दिनांक १८/०३/२०२५ रोजी पकडण्यात आले आहे.



आरोपी सोहेल अली अजगर अली अमीन